पोलीस आयुक्त, ठाणे अंतर्गत शिळ डायघर पोलीस स्टेशन, गु.र.नं.६३/२०१३ (आदर्श बी बिल्डींग दुर्घटना प्रकरण) या गुन्ह्याच्या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रकरणांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड. श्री.शिशिर हिरे यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी २०१५/प्र.क्र.३१४/पोल-१०
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०१ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ :- १) शासनपत्र विधि व न्याय विभाग,क्र.११४/४९/क्रिमी.जन./२०१७/अे- ब्रँच दिनांक १८.०९.२०१७

शासन निर्णय :-

पोलीस आयुक्त, ठाणे अंतर्गत शिळ डायघर पोलीस स्टेशन, गु.र.नं.६३/२०१३ (आदर्श बी बिल्डींग दुर्घटना प्रकरण) या गुन्ह्याच्या संदर्भातील मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड.श्री.शिशिर हिरे यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन दिनांक १८.०९.२०१७ चे पत्रान्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड. श्री.शिशिर हिरे यांना खालीलप्रमाणे व्यावसायीक फी अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) प्रतीदिन परिणामकारक सुनावणी फी रू. २०,०००/- (रूपये वीस हजार फक्त)

ब) प्रत्यक्षात केलेला प्रवास व निवास खर्च.

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.शिशिर हिरे यांना अपरिणामकारक सुनावणी फी अथवा अन्य कोणतीही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाही.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र - २०१५/प्र.क्र.२१/२०१५/ विनियम, दिनांक २९ जुलै, २०१५ अन्वये, वित्तीय अधिकार नियम नियम पुस्तिका - १९७८, भाग-पहिला, उपविभाग - दोन मध्ये नव्याने समावेश केलेल्या अ.क्र.४९ नियम क्र.१६६-अ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार व विधि व न्याय विभागाच्या पत्र क्र. ११४/४९/क्रिमी. जन/२०१७/अे-ब्रँच दिनांक १८.०९.२०१७ च्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०११५४२२५५६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2017.11.01 15:29:40 +05'30'

(किशोर शा.भालेराव)
उप सचिव (विधि), गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस आयुक्त, ठाणे.
२. महालेखापाल१- (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
५. ॲड. श्री. शिशिर हिरे (पोलीस आयुक्त, ठाणे यांच्या कार्यालयामार्फत)
६. विधी व न्याय विभाग (का १४), मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती (पोल-१०).